(२)

जा. क्र. माध्य. ३/प्रथम मान्यता/पुवि/१३९९६
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे :- १ यांचे कार्यालय.
दि. :- 18 DEC 1996

प्रति,

मा. शिक्षणाधिकारी [माध्यमिक],
जिल्हा परिषद, पुणे

विषय :- प्रथम मान्यता.
राजगड विद्यालय, वाजेघर बुद्रुक, ता. वेल्हा

संदर्भ :- आपले पत्र क्र. शिक्षण/माध्य/ह-४/९४-९५ दि. १५-७-९५ व २४-९-९६

वरील संदर्भीय पत्रान्वये कळविण्यात येते की, माध्यमिक शाळा संहिता नियम ३.१, ३.२, ३.३, अन्वये गुंजवणी विभाग विकास महामंडळ घतपे बु. ता. भोर संस्थेच्या माध्य. राजगड विद्या. वाजेघर बुद्रुक, ता. वेल्हा माध्यमिक शाळेच्या इयत्ता ८वी [illegible] च्या वर्गास सन १९९४ - १९९५ या शैक्षणिक वर्षासाठी जून १९९ पासून प्रथम मान्यता देण्यात येत आहे. सदर मान्यता खालील अटींच्या पूर्ततेस अधीन राहून देण्यात येत आहे. शिक्षणाधिकारी [माध्यमिक] यांनी खालील अटींची पूर्तता शाळा करीत आहे किंवा कसे याची तपासणी करून पुढील मान्यतेच्या वेळी प्रस्ताव पाठवितांना खालील अटी पूर्ण केलेल्या आहेत किंवा कसे याबाबतही अहवाल प्रस्तावासोबत पाठविण्यात यावा.

१] संस्थेने स्वत:च्या मालकीची शैक्षणिकदृष्टया योग्य व पुरेशी इमारत उपलब्ध करून द्यावी.
२] मुख्याध्यापक पदी पात्र व अनुभवी व्यक्तीची नेमणूक करावी.
३] स्वतंत्र व विषयावर प्रयोगशाळा सर्व साहित्यानीशी उपलब्ध करून द्यावी.
४] स्वतंत्र ग्रंथालयाची सोय उपलब्ध करून दरवर्षी अधिक ग्रंथाची भर घालावी.
५] विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात पुरेसे फर्निचर व शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून द्यावे.
६] पुरेसा प्रशिक्षित शिक्षक वर्ग उपलब्ध करून द्यावा.
७] स्वतंत्र स्वच्छतागृहाची सोय उपलब्ध करून द्यावी.
८] वाढीव फी चे दर मा. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य पुणे यांचेकडून मंजूर करून घ्यावेत.
९] शालेय रेकॉर्ड माध्यमिक शाळा संहिता नियमाप्रमाणे ठेवून त्यात अद्यावत नोंदी घेण्यात याव्यात.
१० ] कर्मचा-यांना सरकारी वेतनश्रेणीनुसार वेतन अदा करावे.
११ ] शिक्षकांची भविष्य निर्वाह निधी खाती उघडावीत.
१२ ] विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी करावी.
१३ ] विद्यार्थी संख्या वाढवावी.
१४ ] अध्यापनात शैक्षणिक साधनांचा उपयोग करावा.
१५ ]

स्वाक्षरीत शि. उ. सं. यांची सही असे

शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे-१. करीता

प्रत :- मुख्याध्यापक, माध्यमिक विद्यालय, वाजेघर बु. ता. वेल्हा.

Scanned with CamScanner

"यशवंतराव चव्हाण भवन"
जिल्हा परिषद पुणे.
शिक्षण विभाग (माध्यमिक)
जा.क्र.शिक्षण/माध्य/ह-४/नै.वाढ/९५
पुणे, दि. १७/८/९५.

प्रति,

BOOK-POST

मुख्याध्यापक / मुख्याध्यापिका,

~~राजगड माध्यमिक विद्या. वाजेघर.~~
~~ता. वेल्हे. जि.पुणे~~

**विषय :- नैसर्गिक वाढीने परवानगी देणेबाबत.**

सन १९९५-९६, इ.~~६ वी, ७वी~~, ९वी, ~~१०वी~~.

आपल्या ~~गुंजवणी विभाग विकास महामंडळ~~ द्वारा संचलित राजगड विद्यालय, वाजेघर ह्या माध्यमिक शाळेतील इ.८वी/~~५ वी~~ चे वर्गास ( माध्यम मराठी/~~इंग्रजी~~ ) सन १९९४ - ९५ या शैक्षणिक वर्षापासून मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे १ यांचेकडील आदेश क्र. माध्य २(७)नमाशा/मान्यता/पुवि/१४ दि.१७/३/९५ अन्वये शासनाची परवानगी मिळालेली आहे. ससन १९९५ - ९६ या शैक्षणिक वर्षापासून आपल्या माध्यमिक शाळेत इ.~~६ वी, ७ वी~~, ९ वी, ~~१० वी~~ चा वर्ग नैसर्गिक वाढीने सुरु होत असून सदर वर्गास परवानगी देण्यात येत आहे. तरी आपण सदर वर्गाची ---- वार्षिक तपासणी करुन घेणेसाठी उपशिक्षणाधिकारी, शिक्षण माध्यमिक जि.प.पुणे/ गट ~~शिक्षणाधिकारी, पंचायत समिती वेल्हे~~ यांचे कार्यालयाशी संपर्क साधावा. वेळेत तपासणी करुन घेवून तपासणी अहवाल या कार्यालयाकडे सादर करणेत यावा.

ज्या माध्यमिक शाळांमध्ये इ. १० वी वर्ग नैसर्गिक वाढीने सुरु होत आहे त्या माध्य. शाळांनी मा. विभागीय सचिव, महाराष्ट्र राज्य माध्य. व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे विभागीय मंडळ, पुणे १० यांचे कार्यालयात संकेतांक मिळणेसाठी लागणारी कागदपत्रे माहे जून मध्ये सादर करणे आवश्यक आहे.

(स्वाक्षरी)
शिक्षणाधिकारी (माध्य)
जिल्हा परिषद पुणे.करिता.

Scanned with CamScanner

"यशवंतराव चव्हाण भवन"
जिल्हा परिषद पुणे.
शिक्षण विभाग (माध्यमिक)
जा.क्र.शिक्षण/माध्य/ह-४/नै.वाढ/ ९६
पुणे, दि. १।७।९६

प्रति,

BOOK POST

मुख्याध्यापक / मुख्याध्यापीका,



राजगड विद्यालय, वाजेघर.
ता. वेल्हे जि. पुणे.

विषय :- नैसर्गिक वाढीने परवानगी देणेबाबत.

सन १९९६-९७, इ. ६ वी, ७वी, ९वी, १०वी.

आपल्या गुंजवणी विभाग विकास महामंडळ, व्दारा संचालित राजगड विद्यालय वाजेघर ह्या माध्यमिक शाळेतील इ.८वी/ ५ वी चे वर्गास ( माध्यम मराठी/इंग्रजी ) सन १९९४ - ९५ या शैक्षणिक वर्षापासून मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे १ यांचेकडील आदेश क्र. माध्य ३(२)नमाशा/मान्यता/पुवि/९४ दि. १५।३।९५ अन्वये शासनाची परवानगी मिळालेली आहे. सन १९९६-९७ या शैक्षणिक वर्षापासून आपल्या माध्यमिक शाळेत इ.६ वी, ७ वी, ९ वी, १० वी चा वर्ग नैसर्गिक वाढीने सुरु होत असून सदर वर्गास परवानगी देणेत येत आहे. तरी आपण सदर वर्गाची वार्षिक तपासणी करुन घेणेसाठी उपशिक्षणाधिकारी, शिक्षण-माध्यमिक जि.प.पुणे/ गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती वेल्हे यांचे कार्यालयाशी संपर्क साधावा. वेळेत तपासणी करुन घेवून तपासणी अहवाल या कार्यालयाकडे सादर करणेत यावा.

ज्या माध्यमिक शाळांमध्ये इ. १० वी वर्ग नैसर्गिक वाढीने सुरु होत आहे त्या माध्य. शाळांनी मा. विभागीय सचिव, महाराष्ट्र राज्य माध्य. व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे विभागीय मंडळ, पुणे १० यांचे कार्यालयात संकेतांक मिळणेसाठी लागणारी कागदपत्रं माहे जून मध्ये सादर करणे आवश्यक आहे.

(सही)
शिक्षणाधिकारी (माध्य)
जिल्हा परिषद पुणे करिता.

Seen
KPKhutwad
Chairman
26/7

Scanned with CamScanner